# ।। वाय निरणा को अंग ।।

# मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ वाय निरणा को अंग लिखंते ।।

।। कवत ।।

कोरम किरकल नाग देवदत्त ।। धनंजे होई ।।
पान अपान हुलास ।। चुपक वित्रक केहे सोई ।।
तेज खुलासा जोस ।। भ्रान बैकण सिस हीरं ।।
शब्द संगम सुख प्राण ।। बिरंग खास तरंग ।।
धीरं धुरम धुन तत्त ।। वाय फेर चोरासी जाण ।।
सुखराम उलट ऊँची चढे ।। ज्याँ तत्त मूळ बखाण ।।१।।

वायू पुढील प्रकारचे आहेत,कुर्म,क्रुकल,नाग,देवदत्त,धनंजय,पान,अपान,उल्हास,चुपक, वित्रक,तेज,खुलासा,जोष,भ्रान,बहीकण,सीस,हिरंग,शब्द,संगम,सुख,प्राण,बिरंग,खास,त रंग,धीर,धुरम,धुन्न,तत्त अशाप्रकारे चौऱ्यांशी वायु जाणा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो उलटून वर चढतो,तोच तत्तमुळ वायु आहे. ।।१।।

अर्थ ।।

कोरम सुं आँख फरके ।। किरकल सुं छीक आवे ।।
नाग सुं डकार आवे ।। देवदत्त सुं उबाक आवे ।।
धनंजे सुं मुवा पीछे सूजे ।। पान सुं बाव सुरे ।।
अपान सुं मळ झडे ।। हुलास सुं मन हुलसे ।।
चुपक सुं दर्वाजा जडी जे ।। तेज सुं दर्वाजा खुले ।।
खुलास सुं दिल खुले ।। जोस सुं तामस आवे ।।
भिरांन सु भ्रम ऊठे ।। बेकण सुं जीव बेके ।।
सिस सुं समता आवे ।। हिरंग सुं हरष उपजे ।।
सबद सुं बोले ।। सुषमना सुं संगम होय ।।
सुषमसुं साच आवे ।। रंग से बिरज उतरे ।।
धिरंग वाय से धात लागे ।। धुम से अनहद गाजे ।।
धुन वाय से धूजे ।। तत्त वायसे तलब लागे ।।
तत्त मुळ वाय उलट उँची चडे ।। ज्याँ सुं पेदास हुई ।।
तिण मे जाय मिले ।। चोरासी वाय हे ।।
तिकण मे अठाईस बडी ।। तिण मे चवदे बडी ।।
तिण मे सात बडी ।। तिण मे पाँच बडी ।।
तिण मे एक बडी ।। तत्त वाय मुळ वायं बडी ।।
ब्रम्ह से ऊपनी ।। तत्त मुळ खोज ।।
ब्रहंमंड चडे सो ब्रम्ह कहाय ।। ।।२।।

कुर्म वायुने डोळे फड फड्तात.क्रुकळ वायुने शींक येते.नाग वायुने ड्कार येतो.देवदत्त वायुने उबाक(जांभळी)येते.धनंजय वायुने मृत्युनंतर मुर्दा फुलतो.(धनंजय वायू मृत्युच्या वेळी येतो,मृत्युच्या वेळेच्या आधी धनंजय वायु येत नाही.धनंजय वायु आल्यानंतर तो प्राणी कोणाकडूनही वाचत नाही,काही मिनीटात त्याचा मृत्यु होतो.मेल्यानंतर मुर्दा या धनंजय वायुने फुलतो.प्राण वायुने मुर्दा सड्तो.अपान वायुने मळ झड्तो.उल्हास वायुने मन उल्हासीत होते.चुपक वायुने दरवाजे लागुन चूप राहतो,काही बोलले जात नाही. तेज वायुने दरवाजा उघड्तो.खुलासा वायुने ह्रदय खुलते.जोश वायुने तामस(क्रोध) उत्पन्न होतो.भ्राण वायूने भ्रम उत्पन्न होतो.बहकीन वायुने जीव बहकतो.सीस वायुने समता (शांतता)येते.हिरंग वायुने हर्ष उत्पन्न होतो.शब्द वायुने बोलायला लागतो.सुषमणा वायूने संगम होतो.सुषम वायुने विश्वास येतो.पिअंग वायुने उलटी होते.बिरंग वायुने विरह उत्पन्न होतो.खासन वायुने खोकला होतो,विरंग वायुने वीर्य उतरते,धीरंग वायुने धातू लागते.धुम वायूने अनहद गाजतो,धुन्न वायुने धूजतो.तत्त वायुने तलब लागते, तत्तमुळ वायु उलटून वरती चढतो,जेथून उत्पन्न झाला तेथे जाऊन मिळतो,चौऱ्यांशी वायु आहेत, ज्याच्यात अठ्ठावीस मध्ये चौदा मोठे आहेत,त्या चौदामध्ये सात मोठे आहेत,या सातमध्ये पाच मोठे आहे,या सर्वामध्ये एक तत्तमुळ वायू मोठी आहे,ही तत्तमुळ वायु शोधून ब्रह्मंड्मध्ये चढून जाते,ब्रह्मंडात जी चढते त्या वायूलाच ब्रह्म वायू म्हणतात. ।।२।।

।। इति वाय निरणा को अंग संपूरण ।।